# पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्र.: ०२०-२५६०११८५/८६
फॅक्स : ०२०-२५६९७३८८
संकेतस्थळ : www.unipune.ac.in

**प्रशासन शिक्षकेतर कक्ष**
गणेशखिंड, पुणे - ४११ ००७

**संदर्भ क्र. ए एन-** 4229

**दिनांक :-** 16 NOV 2011

मा.विभागप्रमुख
प्रशासकीय व शैक्षणिक विभाग
पुणे विद्यापीठ,
पुणे ४११ ००७

***विषय :- पुरुषोत्तम महादेव देशपांडे पुरस्कार २०१२...***

महोदय,

विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार मागील वर्षापासून १० फेब्रुवारी रोजी "पुरुषोत्तम महादेव देशपांडे पुरस्कार" देण्यात येत असून सदर पुरस्कारासाठी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या विहीत नमुन्यातील प्रपत्रातील माहिती मागविण्यात येत आहे.

"पुरुषोत्तम महादेव देशपांडे पुरस्कार" साठी शिफारस करताना, सोबत स्वयं-मुल्यांकन प्रतिवेदन प्रपत्र ही माहिती संबंधिताकडून भरुन घेऊन आपल्या शिफारशीमार्फत प्रशासन शिक्षकेतर कक्षाकडे पाठविण्यात यावेत. दिनांक १० फेब्रुवारी, २०१२ रोजी सदरचा पुरस्कार हा पुणे विद्यापीठातील वर्ग २ या गटातील सेवकांसाठी असल्याने, फक्त वर्ग २ मधील सेवकांच्याच शिफारशी पाठविण्यात याव्यात. सोबत पुरस्काराचे नियम व अटी, स्वयं-मुल्यांकन व प्रतिवेदन प्रपत्रक सोबत जोडले आहे.

संबंधित सेवकाने माहिती भरल्यानंतर मा.विभागप्रमुख, प्रशासकीय / शैक्षणिक विभाग यांनी भरलेल्या माहितीची शहानिशा करुन आपल्या अभिप्रायासह सोबत जोडलेला प्रतिवेदन अहवाल गोपनीयरीत्या शनिवार, दिनांक ३१ डिसेंबर, २०११ पर्यंत मा.कुलसचिव, पुणे विद्यापीठ, गणेशखिंड, पुणे ७ यांच्या नावे पाठवावा. उशिरा आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही. सदर अहवाल पाठविताना लिफाफ्यावर "पुरुषोत्तम महादेव देशपांडे पुरस्कार, स्वयं-मुल्यांकन प्रतिवेदन अहवाल" असा स्पष्ट उल्लेख करावा.

कळावे,

आपला,

(डॉ. मा. ल. जाधव)
कुलसचिव

सोबत :- वरीलप्रमाणे.

1/E:/MD/2010/SK/PMD Puras.

# पुणे विद्यापीठ

## नियम व अटी

## "पुरुषोत्तम महादेव देशपांडे पुरस्कार"

१) पुरस्काराचे नाव "कै.पुरुषोत्तम महादेव देशपांडे" असे राहील.

२) दरवर्षी १० फेब्रुवारी या विद्यापीठ वर्धापन दिनी हा पुरस्कार प्रदान करण्यात येईल.

३) विद्यापीठाचे स्मृतीचिन्ह, प्रमाणपत्र व रू.२६००/- चा धनादेश देवून सेवकास सन्मानित करण्यात येईल.

४) हा पुरस्कार चक्रक्रमाने वर्ग ३, वर्ग २ व वर्ग १ मधील कायम सेवकास देण्यात येईल.

५) सदर पुरस्कारासाठी थेट शिक्षकेतर सेवक विभागप्रमुखांमार्फत आवश्यक त्या कागदपत्रांसह अर्ज करतील. अधिक तपशिलासाठी आवश्यक ती कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.

६) पुरस्कार विभागून देण्यात येणार नाही.

७) सेवक सेवेत कायम असावा व किमान दहा वर्षे सेवा झालेली असावी.

८) सेवकास शिक्षा झालेली नसावी. त्यांचेवर कोणतीही विभागीय चौकशी चालू नसावी/ कारवाई झाली नसावी /कोणतेही आरोप ठेवलेले नसावेत.

९) सेवकाचे बाबतीत कोणताही नैतिक अध:पतनचा गुन्हा शाबीत झाला नसावा/चालू नसावा अथवा त्यांचेवर कोणतीही कार्यवाही चालू नसावी.

१०) अधिक तपशीलासाठी आवश्यक ती प्रमाणपत्रे जोडण्यास हरकत नाही.

११) सेवकास संगणकाचे किमान ज्ञान असणे आवश्यक आहे.

१२) स्वयं सुधारणेसाठी विविध प्रशिक्षण वर्ग पूर्ण करणा-या सेवकास प्राधान्य देण्यात येईल.

१३) छाननी समितीमध्ये असलेल्या सदस्यांबाबत आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत.

१४) पुरस्काराचा धनादेश, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र समक्ष घेऊन जाणे आवश्यक आहे.

१५) विद्यापीठातील विभागप्रमुखाने त्यांच्या नियंत्रणाखालील काम करीत असलेल्या सेवकाची पुरस्कारासाठी दिलेली माहिती ग्राहय धरण्यात येईल. छाननी समितीस सदरची माहिती तपासण्याचे संपूर्ण अधिकार राहतील.

१६) आवश्यक त्या माहितीचा अभाव आढळल्यास निवड समिती अशा सेवकाचा पुरस्कारासाठी विचार करणार नाही.

१७) काही अपरिहार्य कारणाने पुरस्कार प्राप्त सेवकास वर्धापनदिनी उपस्थित राहता आले नाही तर त्याची पूर्वसूचना देवून विद्यापीठ कार्यालयातून समक्ष पुरस्कार घेऊन जावा.

१८) दिलेल्या प्रमाणपत्राचा गैरवापर होणार नाही याची दक्षता पुरस्कर्त्यांनी घेणे आवश्यक आहे.

१९) विभागप्रमुखांकडून प्राप्त होणा-या अर्जांची छाननी करण्यासाठी व सेवकाची शिफारस करण्यासाठी खालीलप्रमाणे समितीची रचना राहील. :-

१. मा.कुलगुरु यांनी नामनिर्देशित केलेले मा.व्यवस्थापन परिषदेचे एक सदस्य.(अध्यक्ष)

२. मा.कुलगुरु यांनी नामनिर्देशित केलेले प्राचार्य

३. मा.कुलगुरु यांनी नामनिर्देशित केलेले प्रशासकीय क्षेत्रातील एक अनुभवी व्यक्ती.

४. मा.कुलगुरु यांनी नामनिर्देशित केलेले शैक्षणिक क्षेत्रातील एक अनुभवी व्यक्ती.

५. मा.कुलसचिव

२०) एखाद्या सेवकास एकदा पुरस्कार मिळाल्यानंतर त्याच सेवकास पुन्हा पुरस्कार देता येणार नाही.

२१) पुरस्कारासंबंधी मा. कुलगुरू यांचा निर्णय अंतिम राहील.

२२) वरील व्यतिरिक्त परिस्थितीच्या तपशिलानुसार आणि वरील नियमांचे अर्थ लावण्याचे अधिकार मा.कुलगुरू यांना राहतील.

**पत्रव्यवहारासाठी देणगीदाराचा पत्ता :-** श्री.उमेश पुरुषोत्तम देशपांडे

१, गुलमोहर स्नेहनगर, २१६३-ब, सदाशिव पेठ,

पुणे ४११ ०३०

## मा.विभागप्रमुखांनी सादर करावयाचा अहवाल.
## सेवकाची वैयक्तिक माहिती

सेवकाचे नांव :- -------------------------------------

सध्या धारण करीत असलेले पद : ------------------------ वर्ग : अ/ ब/ क

इतर माहिती

| | | |
|---|---|---|
| मागील तीन वर्षांचे गोपनीय अहवालाचा दर्जा (वर्षनिहाय) | :- | ------------------------------------- |
| सेवकाची विश्वासार्हता | :- | उत्तम / चांगली / बरी |
| सेवकाविरूध्द कोणता गुन्हा नोंदविला आहे का? | :- | होय / नाही |
| सेवाकालावधीत शिक्षा झाली का? | :- | होय / नाही |
| गुन्हा नोंदविला असल्यास क्राईम-ऑफेन्स/नैतिक अध:पतनविषयक गुन्हा शिक्षेचे स्वरूप. | :- | ---------------------------------- |
| सर्वसाधारण वर्तणुकीबाबत अभिप्राय | :- | उत्तम / चांगली / बरी |
| उद्योगप्रियता | :- | उत्तम / चांगली / बरी |
| कार्यतत्पर आहे काय ? | :- | होय / नाही |
| कामातील अचूकता | :- | उत्तम / चांगली / बरी |
| कामात नियमितपणा | :- | उत्तम / चांगली / बरी |
| सहभागाची भावना | :- | उत्तम / चांगली / बरी |
| कामात व्यवस्थितपणा | :- | उत्तम / चांगली / बरी |
| उपस्थिती | :- | उत्तम / चांगली / बरी |
| वरिष्ठांशी वर्तणूक | :- | उत्तम / चांगली / बरी |
| सहका-यांशी वर्तणूक | :- | उत्तम / चांगली / बरी |
| समाजात मान/प्रतिष्ठा | :- | उत्तम / चांगली / बरी |
| कामाची विश्वासार्हता | :- | उत्तम / चांगली / बरी |
| कामाची सखोल माहिती | :- | उत्तम / चांगली / बरी |
| कार्यालयीन कामाची आत्मियता | :- | उत्तम / चांगली / बरी |
| संगणकाचे ज्ञान | :- | उत्तम / चांगली / बरी |
| विद्यार्थी, पालक व समाजाशी असलेले संबंध / सहकार्याची भावना | :- | उत्तम / चांगली / बरी |

इतर काही बक्षीसे, पारितोषिके सन्मान मिळालेले आहेत का ? असल्यास त्याच्या छायांकित प्रती जोडाव्यात. :- होय / नाही

कार्यरत असताना गौरवास्पद घटना घडली असल्यास उल्लेख करावा. :- ------------------------------------
------------------------------------

विभागीय चौकशी व न्यायालयीन कारवाई चालू आहे का :- होय / नाही

प्रतिष्ठित सन्माननीय व्यक्तींनी दिलेली पुरस्कार पत्रे (निवडक पत्रे जोडावीत) :- ------------------------------------

खेळामध्ये आवड आहे का/कोणत्या :- होय / नाही

संस्थेबद्दल बांधिलकी (थोडक्यात अभिप्राय) :- ------------------------------------

क्रीडा, संगीत, साहित्य, लेखन, वाचन, सांस्कृतिक कार्यक्रम इ.सहभाग :- ------------------------------------

मा.विभागप्रमुखांचे सेवकाबाबतचे मुल्यांकन (योग्य त्या समर्थनासह) :- ------------------------------------

वरील माहिती व्यतिरिक्त काही सांगावयाचे असल्यास शिफारस :- ------------------------------------

वरील माहिती उपलब्ध कागदपत्रे, प्रत्यक्ष पाहणी व अन्य माध्यमातून ज्ञात आहे. ती सत्य असून पुरस्कारासाठी मी त्यांची शिफारस करीत आहे.

दिनांक :

विभागप्रमुख,
(शैक्षणिक/प्रशासकीय)

"प्रपत्र -अ"

# " पुरुषोत्तम महादेव देशपांडे पुरस्कार "
## स्वयंमुल्यांकन अहवाल.
**(संबंधित सेवकाने भरावयाची माहिती)**

## -: वैयक्तिक माहिती :-

नांव :- ______________________

जन्मतारीख :- / / वय :-

सध्याचा पत्ता :- ______________________
______________________

कायमचा पत्ता :- ______________________
______________________

कामाचा विभाग :- ______________________

सध्याचे पद :- ______________________ वर्ग :- अ / ब /क

प्रथम नियुक्तीचा दिनांक व पद :- ______________________

एकुण सेवा :- शैक्षणिक अर्हता :-

## -: इतर माहिती :-

धारण केलेली पदे :- पदनाम विभाग कालावधी

१.
२.
३.
४.

संगणकाचे ज्ञान आहे का? :- ______________________
(विशेष माहिती द्यावी)

सेवाअंतर्गत प्रशिक्षण व तपशील :- ______________________

नैतिक अध:पतन विषयक काही गुन्हयाची :- होय / नाही.
आपल्या नावावर नोंद आहे काय?
आणि तो सिध्द झाला आहे काय?

यापूर्वी मिळालेली बक्षीसे, पारितोषिके :- १.
सन्मान (संस्थेत व संस्थेबाहेर) २.
३.

क्रीडा व सांस्कृतिक सहभाग आहे का? :- होय / नाही.
(संस्थेत व संस्थेबाहेर)

सामाजिक कार्यात सहभाग आहे का? :- होय / नाही.
(उदा. राष्ट्रीय एकात्मता, धर्मनिरपेक्षता प्रौढ शिक्षण, दुष्काळ निवारण, राष्ट्रीय साक्षरता अभियान इत्यादी )

इतर माहिती असल्यास :- ____________________

या पुरस्कारासाठी आपली योग्यता थोडक्यात नमूद करावी. :- ____________________

वरील माहिती माझ्या समजुतीनुसार खरी आहे.

**सही :-**

**सेवकाचे नाव :- ( ____________________ )**

**दिनांक :-**

**ठिकाण :-**